

शॉन सटन

# पहिली आणि शेवटची पीडा

# पहिली आणि शेवटची पीडा

## शॉन सटन

### निषिद्ध फळ: जेव्हा ईश्वराची आज्ञा पाळणे बेकायदेशीर ठरते)

**May 2026**

ह्या पुस्तकाचे मराठी अनुवाद भाऊ जोएल एलिझाबेथ साळवी यांनी केले आहे. तसेच पुनर्वाचनासाठी ताई सुनीता मोहिते यांनी मदत केली आहे.

# पहिली पीडा: मिसराच्या पापाचे परिणाम

मिसरावरील पीडांबद्दल स्तोत्रकर्त्याने घोषित केले की देवाने “आपला भयंकर क्रोध, संताप, कोप आणि संकट त्यांच्यावर पाठविले...” स्तोत्र ७८:४९. परंतु देवाने आपला “क्रोध” आणि “कोप” त्यांच्यावर कसा पाठविला? आपण जसा आपला राग आणि संताप व्यक्त करतो, त्याच प्रकारे काय? की देवाचे मार्ग आपल्या मार्गांपेक्षा उच्च आहेत आणि त्यांचे विचार आपल्या विचारांपेक्षा श्रेष्ठ आहेत? (यशया ५५:९).

देवाच्या “क्रोधासाठी” वापरलेला शब्द हा इब्री भाषेतील “एपीएच” हा शब्द आहे, जो देवाच्या त्यांना नाकारणाऱ्यांप्रती असलेल्या “दीर्घसहनशीलतेचे” वर्णन करणाऱ्या मूळ शब्दाशी संबंधित आहे. या शब्दाचा अर्थ असा आहे की, एखादी व्यक्ती जणू हरवलेल्या प्रिय व्यक्तीसाठी दुःखाने हुंदके देत आहे, अशा प्रकारे नाकपुड्यांतून निघणारा तीव्र आणि जड श्वास. ख्रिस्ताच्या जीवनात आपण हे पाहतो, जेव्हा ते शब्बाथ दिवशी आरोग्य देण्यासाठी गेले, पण परुश्यांच्या मानवनिर्मित नियमांमुळे शब्बाथ दिवशी सेवा करणे किंवा आरोग्य देणेही निषिद्ध मानले जात होते. जेव्हा ख्रिस्त त्यांना सामोरे गेले, तेव्हा पवित्र शास्त्र सांगते की, “त्यांनी सभोवती पाहिले आणि त्यांच्या कठोर अंतःकरणामुळे क्रोधाने व अतिशय दुःखाने तो व्यथित झाला...” मार्क ३:५.

त्यांचा क्रोध, किंवा त्यांचे दुःख, हे देखील तेव्हा प्रकट होते जेव्हा ते दुष्टांना त्या मार्गाने चालू देतात जो त्यांना ठाऊक आहे की त्यांच्या हिताचा नाही (निर्गम ४:१०, १४; गणना ११:४, १०, ३१–३२; १ शमुवेल ८:१९–२०; होशेय १३:९–११ पाहा), कारण यामुळे त्यांना फार दुःख होते.

देवाच्या कोपाबद्दल, पौलाने रोमकरांस १ मध्ये लिहिले की, “देवाचा कोप” दुष्टांविरुद्ध प्रकट झाला, जेव्हा त्यांनी त्यांना त्यांच्या पापी जीवनपद्धतीकडे “सोपवून दिले,” कारण त्यांच्या पापांमुळेच त्यांच्यावर त्यांच्या पापांची “योग्य

शिक्षा" आली. रोमकर १:१८, २४, २७ () (अनुवाद ३१:१६–१७; स्तोत्र ८९:४६; १०६:४०–४२; यशया ५४:७–८; यहेज्केल २२:३१; ज्ञान ११:१६ देखील पाहा).[1]

त्याच प्रकारे, जेव्हा मिसराने स्पष्टपणे सर्व सृष्टीचा निर्माणकर्ता (इब्री १:२) आणि पालनकर्ता (इब्री १:३) यांची उपस्थिती नाकारली, तेव्हा त्यांना विनाशाच्या स्वाधीन करण्याशिवाय त्यांच्यापुढे दुसरा पर्याय उरला नाही.

स्तोत्र ७८:४८–५० त्याने त्यांची गुरेढोरे गारांच्या, व जनावरे विजांच्या हवाली केली. 49त्याने त्यांच्यावर आपला कोपाग्नी, क्रोध, रोष व संकट ह्या अनिष्टकारक दूतांची स्वारी सोडली. 50त्याने आपल्या कोपासाठी मार्ग सिद्ध केला; त्याने त्यांचा जीव मृत्यूपासून वाचवला नाही, तर त्यांचा प्राण मरीच्या हवाली केला.

लक्ष द्या की येथे असे म्हटले आहे की देवाने मिसरी लोकांना त्यांच्या कृतींच्या परिणामांपासून "वाचविले नाही," आणि दुष्ट देवदूतांना त्यांच्यामध्ये येऊ दिले. जेव्हा ४८ वचन सांगते की देवाने दुष्टांवर "जळजळीत विजांचे तडाखे" पाठविले, तेव्हा वापरलेला शब्द "रेशेफ" हा आहे, जो केवळ सामान्य नाम नव्हता, तर एक विशिष्ट नाव देखील होते:

"रेशेफ हा एक युद्धप्रिय आणि आक्रमक देव होता, जो रोगांचा उपयोग लोकांवर आक्रमण करण्यासाठी करीत असे; पण तो आरोग्यही देऊ शकत होता. मिसरामध्ये, रेशेफची सुरुवातीला फारोला युद्धांमध्ये सहाय्य करणारा देव म्हणून पूजा केली जात होती; पण नंतर आजारपण आणि दैनंदिन गरजांसाठी

[1] देवाच्या क्रोधाबद्दल काही चांगल्या, सहज समजणाऱ्या माहितीसाठी, कृपया जे ए. शुलबर्ग यांचे 'अॅक्ट्स ऑफ अवर जेंटल गॉड' (विशेषतः अध्याय १३) आणि केविन जे. मलिन्स यांचे 'डिड गॉड किल जीझस इन्स्टेड ऑफ किलिंग अस?' (विशेषतः अध्याय ३) पाहा. या विषयावरील अधिक सविस्तर चर्चेसाठी, कृपया ग्रेग बॉइड यांचे 'क्रुसिफिक्शन ऑफ द वॉरियर गॉड: इंटरप्रिटिंग द ओल्ड टेस्टामेंट्स व्हायोलेंट पोर्ट्रेट्स ऑफ गॉड इन लाईट ऑफ द क्रॉस' (मिनियापोलिस, एमएन: फोर्ट्रेस प्रेस, २०१७), खंड २, अध्याय १५, "डिव्हाईन अकिडो: द क्रॉस अॅज द रेव्हेलेशन ऑफ गॉड्स रॅथ," http://tinyurl.com/2u9jeaz6 पाहा.

त्याला विशेषतः पुकारले जाऊ लागले."[2] मिसराने या खोट्या देवाची उपासना केली होती आणि त्याला यज्ञ अर्पण केले होते. "परंतु मी असे म्हणतो की परराष्ट्रीय लोक जे अर्पण करतात, ते देवाला नव्हे तर दुष्टात्म्यांना अर्पण करतात." १ करिंथकरांस १०:२०. दुष्टात्म्यांच्या उपासनेमध्ये खोलवर अडकलेल्या मिसराला, जेव्हा त्यांनी ख्रिस्ताच्या आत्म्याला नाकारले, तेव्हा शेवटी त्या विनाशकारी शक्तींच्या आणि "नाश करणाऱ्याच्या" स्वाधीन केले गेले ज्यांची ते पूजा करीत होते.

अनुवाद ३२:३७–३८ मग तो म्हणेल, 'त्यांचे देव कोठे आहेत? ज्याच्यावर त्यांनी भिस्त ठेवली तो त्यांचा दुर्ग कोठे आहे? 38त्यांच्या यज्ञातली चरबी खाणारे, त्यांच्या पेयार्पणातला द्राक्षारस पिणारे देव कोठे आहेत? त्यांनी आता उठून तुम्हांला साहाय्य करावे व तुम्हांला आश्रय द्यावा.

दुर्दैवाने, आपल्या पापांच्या मजुरीपासून संरक्षण मिळावे म्हणून रेशेफवर ठेवलेला त्यांचा विश्वास व्यर्थ ठरला.

जेव्हा इस्राएलने ख्रिस्ताला नाकारले, तेव्हा त्या राष्ट्राच्या पापांचा परिणाम पृथ्वीवर झाला आणि मोठा भूकंप घडून आला. त्याचप्रमाणे, अंधकारमय युगांतील अत्याचारी मंडळीने व्यवस्थेने संपूर्ण ख्रिस्ती जगावर रविवारचे नियमशास्त्र लादले, तेव्हा त्याचा परिणाम पिकांच्या नाशामध्ये, दुष्काळामध्ये आणि महामारीमध्ये झाला प्रत्येक गोष्ट दुसऱ्याकडे नेणारी, आध्यात्मिक कारणांपासून परिणामांपर्यंत असा होईल. त्याच प्रकारे, जेव्हा मिसराने शब्बाथ पाळण्यास मनाई करणारे नियम बनविले, तेव्हा परिणाम तेच झाले, पण अधिक तीव्र स्वरूपात. मिसरावरील पीडा नेमक्या कशा घडल्या याविषयी अनेक सिद्धांत आहेत. बहुतेक ख्रिस्ती असा विश्वास ठेवतात की देवाने अलौकिक रीतीने मिसरावर मृत्यू आणि विनाश आणला; परंतु हे संपूर्ण इतिहासभर देवाने

[2] मात्सीज एम. मुनिच, प्राचीन नजीकच्या पूर्वेकडील देव रेशेफ (मोहर सीबेक, २०१३); तसेच विलेम व्हॅन डर हॉर्स्ट, बायबलमधील देवता आणि राक्षसांचा शब्दकोश (ब्रिल, १९९९), पृष्ठ ३३३ पहा.

मानवजातीशी केलेल्या व्यवहाराशी सुसंगत नाही.

आपण पाहिले आहे की जेव्हा देवाला नाकारले जाते, तेव्हा तो दुष्टांना त्यांनी जे पेरले आहे ते उगवू देतो, आणि तो हळूहळू आपली उपस्थिती आणि निसर्गातील तसेच त्यांच्या शत्रूंवरील दोन्ही भौतिक आणि आध्यात्मिक विनाशकारी शक्तींवरील आपली नियंत्रणकारी शक्ती मागे घेतो. इतिहासाकडे पाहिल्यास, देवाचे न्याय तेव्हा प्रकट होतात जेव्हा देव स्वतःला मागे घेतो आणि घटनांची एक साखळी घडू देतो, ज्यामध्ये दुष्टांना त्यांनी जे पेरलेले असते तेच कापावे लागते. जेव्हा आपण पीडांच्या एकत्रित आणि क्रमिक स्वरूपाचा विचार करतो, तेव्हा कारण आणि परिणाम यांची साखळी कार्यरत असल्याचे आपण पाहू शकतो:

१. पाणी रक्तामध्ये बदलणे

२. बेडकांचा प्रचंड उपद्रव

३. चावणारे कीटक (“उवा”)

४. माशा

५. पशुधनांवर रोग

६. फोड

७. गारपीट

८. टोळधाड

९. अंधकार

१०. प्रथमजन्मलेल्यांचा मृत्यू

पहिल्या पीडेमध्ये आपण नाईल नदी दूषित झालेली पाहतो, ज्यामुळे मोठ्या

संख्येने बेडूक जमिनीवर येऊन पसरले असावेत. त्यानंतर लवकरच, बहुधा त्यांपैकी अनेक बेडूक निर्जलीकरणामुळे मरून गेले, ज्यामुळे मिसरी लोकांनी “त्यांचे मोठमोठे ढीग केले, आणि संपूर्ण देश दुर्गंधीने भरून गेला.” निर्गम ८:१४. जेव्हा हे बेडूक त्यांच्या परिसंस्थेतून नाहीसे झाले, तेव्हा नियंत्रणाविना वाढणारे कीटक आणि माशांचे समूह झपाट्याने वाढले असतील आणि त्या बेडकांच्या मृतदेहांकडे आकर्षित झाले असतील. या कीटकांपैकी अनेक रोगवाहक असू शकतात आणि त्यांनी ते रोग मिसरातील पशुधनांमध्ये आणि मानवांमध्ये पसरवले असतील, ज्यामुळे फोड उत्पन्न झाले.[3] प्राणी आणि मानव या दोघांमध्येही रोग निर्माण होण्याचे आणखी एक कारण म्हणजे जीवाणू किंवा विषारी घटकांनी दूषित झालेले पिण्याचे पाणी.

परंतु अशा घटनांची मालिका कशी सुरू झाली असेल? नाईल नदीचे पाणी “नैसर्गिकरीत्या” रक्तामध्ये कसे बदलले असेल? प्रथम, हे शक्य आहे की पवित्र शास्त्राचे लेखक अनेकदा गोष्टी जशा दिसत होत्या तशाच वर्णन करीत असत. याला “दृश्यात्मक भाषा” असे म्हणतात. याचे एक उदाहरण म्हणजे जेव्हा येशूने घोषित केले की शेवटच्या दिवसांमध्ये “तारे आकाशातून पडतील.” मत्तय २४:२९. फारच थोडे लोक या वचनाचा अर्थ असा लावतील की येशू शिकवत होते की आकाशातील तारे त्यांच्या जागेवरून निघून पृथ्वीवर कोसळतील. बहुतेक लोक समजतात की ते एखाद्या उल्कावर्षावासारख्या घटनेचे वर्णन करीत होते, जशी ती आपल्याला दिसते. मानवी दृष्टीने ते पाणी रक्तासारखे लाल झाले होते, म्हणून असे घोषित करण्यात आले की नद्या “रक्तामध्ये बदलल्या [haphak]…” निर्गम ७:१७. हेच शब्द त्या काळाचे वर्णन करण्यासाठी वापरले गेले आहेत, जेव्हा चंद्र “रक्तामध्ये बदलला जाईल…” योएल २:३०–३१. कोणीही असा विश्वास ठेवत नाही की चंद्र प्रत्यक्षात रक्तामध्ये बदलेल; तर तो फक्त रक्तासारखा लाल दिसेल. नाईल नदी प्रत्यक्ष रक्तामध्ये बदलली नव्हती, यावर

[3] जसे की स्टोमॉक्सिस कॅल्सिट्रान्स नावाची माशी, जी बॅसिलस अँथ्रॅसिस (अँथ्रॅक्स) वाहून नेऊ शकते, ज्यामुळे फोड येऊ शकतात. वॉल्टर सी. कैसर ज्युनिअर, अ हिस्ट्री ऑफ इस्रायल: फ्रॉम द ब्रॉन्झ एज थ्रू द ज्यूइश वॉर्स (नॅशविल, टीएन: ब्रॉडमन अँड होल्मन पब्लिशर्स, १९९८), पृष्ठ ९८.

विश्वास ठेवण्याचे आणखी एक कारण म्हणजे “मिसरी लोकांनी पिण्याच्या पाण्यासाठी नदीभोवती खणले...” निर्गम ७:२४. येथे स्पष्ट दिसते की मिसरी लोक “झिरपणाऱ्या विहिरी” खणत होते.

“मूलतः, झिरपणारी विहीर म्हणजे पाण्याच्या स्रोताजवळ जमिनीत खणलेला असा खड्डा होय, जो नैसर्गिक जलपातळीच्या खाली जातो. जलपातळीतील पाणी जमिनीतून झिरपत तुम्ही खणलेल्या खड्ड्यामध्ये येते. जर हा खड्डा मूळ पाण्याच्या स्रोतापासून योग्य अंतरावर खणला गेला, तर पाणी नैसर्गिकरीत्या शुद्ध होते.”[4]

हे स्पष्टपणे सांगते की मिसरी लोक काय करीत होते; परंतु येथे एक समस्या आहे रक्तातून पिण्यायोग्य पाणी गाळून काढण्याचे तंत्रज्ञान हजारो वर्षांनंतर अस्तित्वात आले, आणि झिरपणारी विहीर त्यासाठी उपयोगी ठरली नसती. झिरपणारी विहीर तेव्हाच कार्य करू शकते जेव्हा पाणी दूषित झालेले असते; परंतु जर ते प्रत्यक्ष रक्त असते, तर ती कार्य करू शकली नसती. मग अशी कोणती आपत्ती असू शकते ज्यामुळे नद्या रक्तासारख्या दिसू लागल्या?

याविषयी अनेक सिद्धांत आहेत. त्यांपैकी एक म्हणजे सॅन्टोरिनी ज्वालामुखीचा उद्रेक जो मानवी इतिहासातील सर्वांत मोठ्या ज्वालामुखी उद्रेकांपैकी एक मानला जातो, आणि ज्याने “हिरोशिमा प्रकारच्या वीस लाख अणुबॉम्बांइतकी शक्ती” निर्माण केली होती [5] काहींच्या मते हा उद्रेक निर्गमाच्या काळाजवळ घडला.

“हा सिद्धांत असा मांडतो की मिसरावरील पीडा प्रत्यक्षात ग्रीसच्या दक्षिणेकडील सॅन्टोरिनी बेटावर इ.स.पूर्व १६२०–१६०० च्या सुमारास झालेल्या ज्वालामुखी उद्रेकाचे परिणाम होते. ‘इजिप्तमधील महामारी: पुरातत्वशास्त्र, इतिहास आणि विज्ञान, बायबलकडे एक दृष्टिक्षेप’ या पुस्तकाचे लेखक सूक्ष्मजीवशास्त्रज्ञ सिरो

[4] "सीप वेल," द सर्व्हायव्हल युनिव्हर्सिटी, http://tinyurl.com/n92828hv.
[5] थेरा/सँटोरिनी उद्रेक" (1989), जेट प्रोपल्शन लॅबोरेटरी, https://tinyurl.com/4e8zvhsm.

ट्रेव्हिसानाटो यांचे म्हणणे आहे की प्राचीन मिसरी वैद्यकीय ग्रंथ या कल्पनेला समर्थन देतात.

'उन्हाळ्याच्या काळात वाऱ्यांद्वारे ज्वालामुखीची राख मिसरात पोहोचली असावी, आणि त्या राखेमध्ये विषारी आम्ले होती ज्यांमध्ये सिनाबार हे खनिज होते, जे नदीला रक्तासारखा लाल रंग देण्यास सक्षम होते,' असे ट्रेव्हिसानाटो यांचे मत आहे. पाण्यामधील वाढलेल्या आम्लतेमुळे बेडूक बाहेर उडी मारून स्वच्छ पाण्याच्या शोधात निघाले असतील. कीटकांनी मृत प्राणी आणि जिवंत बचावलेल्या मानवांच्या शरीरांमध्ये अंडी घातली असतील, ज्यांमधून अळ्या आणि नंतर प्रौढ कीटक निर्माण झाले असतील.

यानंतर वातावरणातील ज्वालामुखीच्या राखेमुळे हवामानावर परिणाम झाला असेल, आणि आम्लयुक्त पाऊस लोकांच्या त्वचेवर पडल्यामुळे फोड निर्माण झाले असतील. गवत दूषित झाले असेल, ज्यामुळे ते खाणारे प्राणी विषबाधित झाले असतील. पावसामुळे निर्माण झालेली आर्द्रता आणि त्यानंतर आलेली गारपीट[6] यांमुळे टोळधाडीच्या वाढीसाठी अनुकूल परिस्थिती निर्माण झाली असेल. ज्वालामुखी उद्रेकांमुळे अनेक दिवस अंधकारही निर्माण होऊ शकतो [कारण राखेमुळे सूर्य झाकला जातो]..."

"यासाठी कोणते पुरावे आहेत? प्यूमिस हा थंड झालेल्या ज्वालामुखीच्या लाव्हापासून तयार झालेला दगड आहे, आणि मिसरामध्ये कोणतेही ज्वालामुखी नसतानाही मिसरी अवशेषांच्या उत्खननात तो आढळून आला आहे. या दगडाच्या विश्लेषणातून असे दिसून आले की तो सॅन्टोरिनी ज्वालामुखीतून आला होता, ज्यामुळे सॅन्टोरिनीच्या उद्रेकातून निर्माण झालेली राख मिसराच्या किनाऱ्यांपर्यंत पोहोचली होती याचा भौतिक पुरावा मिळतो."[7]

---

[6] डोरोथी व्हिटालियानो यांच्या मते, "... सातवी पीडा, गारपीट आणि वीज यांचा संबंध अनेकदा ज्वालामुखीच्या उद्रेकांशी जोडला जातो. राखेचे लहान कण गारपिटीसाठी संघनन केंद्र म्हणून काम करू शकतात आणि राखेने भरलेल्या हवेत तीव्र विद्युत प्रभार सामान्यपणे आढळतो." जेफ्री ए. ली, "इजिप्तच्या पीडांचे स्पष्टीकरण" स्केप्टिकल इन्क्वायरर, खंड २८, अंक ६ (२००४), पृष्ठ ५४, http://tinyurl.com/5n7mahmy.

[7] ऑलिव्हिया बी. वॅक्समन, "इजिप्तमधील १० प्लेग खरोखरच घडले का? येथे आहेत ३ सिद्धांत"

नद्यांचे पाणी लाल होण्याचे आणखी एक संभाव्य स्पष्टीकरण म्हणजे "ऑसिलेटोरिया रुबेसेन्स" नावाच्या विषारी गोड्या पाण्यातील शेवाळाची वाढ. हे शेवाळ ३,००० वर्षांपूर्वी अस्तित्वात होते आणि आजही तत्सम परिणाम निर्माण करते. हे शेवाळ उबदार, संथ वाहणाऱ्या आणि पोषक तत्त्वांनी समृद्ध पाण्यामध्ये वाढते; आणि जेव्हा ते मरते, तेव्हा ते पाण्याला लाल रंग देते."[8]

"रेड टाइड" घडत असे तेव्हा, मासे अनेक कारणांमुळे मरत असत; परंतु "बैलबेडूकांकडे सॅक्सिफिलिन नावाच्या प्रथिनाच्या स्वरूपात नैसर्गिक संरक्षण असते,"[9] त्यामुळे बेडूक माशांइतक्या लवकर मरत नसत आणि म्हणून ते विषारी पाण्यातून बाहेर पडू शकत असत (जोपर्यंत ते निर्जलीकरणामुळे मरत नसत).[10] ज्वालामुखी, शेवाळ किंवा इतर काहीही दूषित पाण्याचे भौतिक कारण असले, तरी त्यानंतरचे परिणाम मूलतः सारखेच होते.[11]

या घटनांची साखळी नेमकी कशी घडली याची पर्वा न करता, असे स्पष्ट दिसते की एक साखळीप्रतिक्रिया नक्कीच घडली होती. आज आपल्यासाठी हा एक महत्त्वाचा धडा आहे. आपल्या सवयींचा परिणाम स्वतःवर, आपल्या शेजाऱ्यांवर आणि पर्यावरणावर किती खोलवर होतो, याविषयी आपल्यापैकी किती जण अनभिज्ञ आहेत? शेवाळाच्या वाढीमुळे पाणी रक्तासारखे कसे दिसू शकते, या विषयाचा मी अभ्यास करीत असताना मला लवकरच जाणवले की ही समस्या आजही अस्तित्वात आहे. "लाल शेवाळाची वाढ" किंवा "रेड टाइड" असा गूगल वर साधा शोध घेतला तरी रक्तासारख्या लाल पाण्याच्या आधुनिक काळातील

---

(२०१९), टाईम, https://tinyurl.com/59vvpyuz.

[8] जो श्वार्झ, "दहा प्लेग: नैसर्गिक आपत्ती की दैवी हस्तक्षेप?" (२०१९), मॅकगिल, https://tinyurl.com/33j5cz55.

[9] "विषारी लाल भरतीविरुद्ध एका बुलफ्रॉगचे शक्तिशाली संरक्षण" (२०१९), बर्कले लॅब्स, https://tinyurl.com/53kdv3p3.

[10] पर्यावरणीय ताणामुळे बेडकाच्या पिल्लांच्या रूपांतरणाची प्रक्रिया देखील वेगवान होऊ शकते. यामुळे, कमी झालेल्या भक्षकांसोबत, बेडकांचे मोठ्या प्रमाणावर स्थलांतर झाले असावे.

[11] तथापि, हानिकारक शैवाल प्रस्फुटनामुळे (HAG) गारा आणि अंधार पडत नाही, म्हणून काही जण असे सुचवतात की, सँटोरिनी ज्वालामुखीचा उद्रेक किंवा इतर कोणत्यातरी घटनेसोबत झालेल्या शैवाल प्रस्फुटनाचा परिणाम म्हणून या आपत्ती उद्भवल्या असाव्यात. व्हिटालियानो यांनी त्यांच्या 'लेजेंड्स ऑफ द अर्थ; देअर जिओलॉजिक ओरिजिन्स' (ब्लूमिंग्टन: इंडियाना युनिव्हर्सिटी प्रेस, १९७३), पृ. २५२-२५९ या ग्रंथात या सिद्धांताचा शोध घेतला आहे.

भयावह प्रतिमांचा अंतहीन संग्रह दिसून येतो. या शेवाळाच्या वाढीमुळे निर्माण होणारी विषारी द्रव्ये, ऑक्सिजनची कमतरता, सूर्यप्रकाशाचा अडथळा किंवा विविध माशांच्या गिल्समध्ये अडथळे निर्माण होणे यांमुळे मोठ्या प्रमाणावर सागरी जीवसृष्टी नष्ट होते. हे केवळ प्राण्यांसाठीच दुःखद नाही, तर विविध समुदायांच्या अर्थव्यवस्थेवरही त्याचे घातक परिणाम होतात.

उदाहरणार्थ, एका नवीन अभ्यासानुसार २०१८ मध्ये फ्लोरिडामध्ये झालेल्या "रेड टाइड" मुळे तेथील अर्थव्यवस्थेला सुमारे "२.७ अब्ज डॉलर्सचे नुकसान" झाले.[12] ही काही काल्पनिक गोष्ट नाही, तर प्रभावित लोकांसाठी हा खरा आर्थिक ताण आहे. परंतु या शेवाळाच्या वाढीमागचे कारण नेमके काय आहे? साध्या शब्दांत सांगायचे तर, शेवाळाची वाढ अत्यधिक प्रमाणात तेव्हा होते जेव्हा त्याला नायट्रोजन आणि फॉस्फरस या दोन मुख्य घटकांनी "अतिपोषण" मिळते. हे दोन्ही घटक प्राण्यांच्या मलमूत्रामध्ये मोठ्या प्रमाणावर आढळतात.

"…असे अनुमान आहे की अमेरिकेमधील CAFOs [Concentrated Animal Feeding Operations] मध्ये पाळल्या जाणाऱ्या प्राण्यांकडून दर मिनिटाला जवळजवळ २० लाख पौंड मलमूत्र निर्माण होते. "मानवी कचऱ्याच्या विपरीत, CAFOs मधील मलमूत्रावर प्रक्रिया केली जात नाही; ते सामान्यतः जमिनीखालील खड्ड्यांमध्ये किंवा अनेक एकर व्यापणाऱ्या तलावांमध्ये सोडले जाते. ते तेथे साठवले जाते, जोपर्यंत ते शेतीच्या जमिनीवर खत म्हणून वापरले जात नाही."

परंतु औद्योगिक पशुपालन केंद्रांमध्ये निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण इतके प्रचंड असते की तो सहजपणे शोषला जाऊ शकत नाही. परिणामी, खताचा अतिरेकाने वापर होतो आणि त्यामधील रसायने, विषारी घटक आणि जीवाणू

---

[12] रॉबिन व्हाइट, "लाल भरतीमुळे फ्लोरिडाचे एका वर्षात $2.7 अब्ज डॉलर्सचे नुकसान झाले" (२९ जानेवारी, २०२४), न्यूजवीक, http://tinyurl.com/5bdm2yy4.

स्थानिक जलमार्गांमध्ये वाहून जातात. हे खड्डे किंवा तलाव गळणे, फुटणे किंवा ओसंडून वाहणेही सामान्य आहे, ज्यामुळे भूजल दूषित होते. प्राण्यांवरील औद्योगिक शेती ही अमेरिकेतील नद्या आणि ओढ्यांचे प्रदूषण करणारी प्रमुख कारणांपैकी एक आहे; ती दलदलींच्या प्रदूषणाचे दुसऱ्या क्रमांकाचे, आणि तलावांच्या प्रदूषणाचे तिसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे कारण आहे.

"परिणामी, CAFOs चा जलजीवनावर गंभीर परिणाम होतो, कारण खतामधील नायट्रोजन किंवा फॉस्फरससारख्या पोषक घटकांची अत्यधिक मात्रा पाण्याला राहण्यायोग्य नसलेले बनवू शकते किंवा हानिकारक शेवाळाच्या वाढीस कारणीभूत ठरू शकते. ग्रामीण समुदाय पिण्याच्या पाण्यासाठी मोठ्या प्रमाणावर भूजल विहिरींवर अवलंबून असतात, आणि पर्यावरण संरक्षण एजन्सीच्या २००० च्या राष्ट्रीय जल गुणवत्ता सूचीमध्ये असे आढळले की २९ राज्यांनी विशेषतः CAFOs मुळे पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होत असल्याचे नमूद केले. गेल्या १० वर्षांत CAFOs मुळे निर्माण झालेल्या स्वच्छता खर्चामुळे नगरपालिका जलप्रणालींवर १.१ अब्ज डॉलर्सपेक्षा अधिक खर्च आला आहे."[13]

औद्योगिक पशुपालनाच्या या दुःखद पद्धतीमुळे काही मोजक्या लोकांना प्रचंड नफा झाला आहे; पण कोणत्या किंमतीवर? या उद्योगामुळे केवळ प्राण्यांचे आणि पर्यावरणाचे अमाप दुःख झालेले नाही, तर आपल्या सहमानवांनाही त्याचे दुष्परिणाम सहन करावे लागत आहेत विशेषतः गरीब आणि वंचित समुदायांतील लोकांना. या समुदायांमध्ये प्रक्रिया न केलेले प्राण्यांचे मलमूत्र फवारले जाण्यामुळे "विषारी विहिरी, मालमत्तेच्या किमतीत घट, कमी आयुर्मान, तसेच रहिवाशांमध्ये शारीरिक आणि मानसिक आरोग्य समस्यांचे वाढते

[13] "फॅक्टरी फार्मिंगचे पाणी, हवा आणि हवामानावर होणारे परिणाम," ASPCA, http://tinyurl.com/m88sc7zv. तसेच पाहा ॲन अलेक्झांडर, "फॅक्टरी फार्मिंगचा आणखी एक वाईट परिणाम: अनियंत्रित शेवाळ" (११ ऑगस्ट, २०१६), नॅचरल रिसोर्सेस डिफेन्स कौन्सिल (NRDC), http://tinyurl.com/23dv77fa; काईल राबिन, "विषारी शेवाळाची वाढ आणि शेती: त्यांच्या संबंधाबद्दल जाणून घेण्यासारख्या ५ गोष्टी" (२०१७), वॉटर फूटप्रिंट कॅल्क्युलेटर, http://tinyurl.com/yc7dcjv4.

प्रमाण" यांसारखे परिणाम झाले आहेत.[14]

पाणी रक्तासारखे लाल होण्यापूर्वी (कदाचित शेवाळाच्या वाढीमुळे), पवित्र शास्त्र सांगते की फारोने लोकांना विश्रांती घेण्यास मनाई केली आणि त्यांच्या काम पाहणाऱ्यांना सांगितले, "त्यांच्यावर अधिक कामाचा भार टाका" (निर्गम ५:९). त्यांच्यावर टाकलेले हे काम म्हणजे विटा तयार करण्याचे काम होते, ज्यामध्ये नाईल नदीच्या परिसरातील मातीपासून चिकणमाती तयार केली जात होती. जर जमिनीला विश्रांती घेण्यासाठी वेळ दिला गेला नाही, तर या प्रक्रियेचा पर्यावरणावर अनपेक्षित परिणाम झाला असण्याची शक्यता आहे. हे शक्य आहे काय की फारोचे शोषण करणारे नियम, ज्यांचा परिणाम इब्री लोकांवर झाला, त्याचबरोबर जमिनीवरही झाला? सतत चालणारे विटांचे उत्पादन जसे सतत चालणाऱ्या CAFOs प्रमाणे जमिनीतील पोषक घटकांनी समृद्ध माती आणि खत नाईलमध्ये वाहून गेले असावे, ज्यामुळे शेवाळाची वाढ सुरू झाली असेल? जर तसे असेल, तर फारोचा लोभी अत्याचार आणि गुलामांबरोबर तसेच जमिनीबरोबर केलेले शोषण शेवटी त्याच्यावरच उलटले. या दृष्टिकोनातून पाहता, फारोने गुलामांना मुक्त करावे आणि त्यांना (तसेच जमिनीला) विश्रांती द्यावी ही देवाची मागणी केवळ त्यांच्या भल्यासाठी नव्हती, तर फारोच्या स्वतःच्या भल्यासाठीही होती! शेवाळाच्या वाढीला कोणती गोष्ट कारणीभूत ठरली याची पर्वा न करता, आपण ख्रिस्ताची शिकवण नेहमी लक्षात ठेवली पाहिजे जेव्हा पीडित लोक दुःख सहन करतात, तेव्हा ख्रिस्त स्वतः दुःख सहन करतात (मत्तय २५:४०); आणि जर आपण शोषण व अन्याय वाढविणाऱ्या उद्योगांना समर्थन देत असू, तर आपण त्या लोकांमधील ख्रिस्ताच्या दुःखांनाच वाढवत आहोत.[15] कारण आणि अदृश्य परिणाम याविषयीचा हा धडा, जो देव या

---

[14] जेमी बर्गर, "जगातील स्वस्त बेकनची किंमत कृष्णवर्णीय नॉर्थ कॅरोलिनियन कशी चुकवतात" (१ एप्रिल, २०२२), वॉक्स, http://tinyurl.com/2njem3nh.

[15] हे देखील लक्षात घेतले पाहिजे की, फॅक्टरी फार्मिंग उद्योगातील अनेक शेतकरी हे या व्यवस्थेबाहेरील लोकांप्रमाणेच परिस्थितीचे बळी आहेत; ते आपल्या सहानुभूती आणि कळकळीस पात्र आहेत. यापैकी अनेक व्यक्ती या व्यवस्थेत अडकले आहेत आणि आर्थिक कारणांमुळे त्यातून बाहेर पडू शकत नाहीत. त्यांना यातून कसे बाहेर पडायचे किंवा बाहेर पडल्यावर काय करायचे हे देखील माहित नसते. याचे एक उत्तम उदाहरण म्हणजे कोंबडीपालक क्रेग वॅट्स, ज्यांचा संघर्ष

पीडांद्वारे आपल्याला शिकवू इच्छितात, आपण विसरू नये.

काही लोक असे सुचवू शकतात की मिसरावरील पीडा केवळ नैसर्गिक आपत्तींचे परिणाम होते आणि त्यामध्ये देवाचा काहीही सहभाग नव्हता; परंतु असा दृष्टिकोन चुकीचा आहे, कारण तो बायबलमधील कथनातील अनेक महत्त्वाच्या पैलूंना दुर्लक्षित करतो. प्रथम, आपण या गोष्टीचा विचार करू या की पवित्र शास्त्रानुसार प्रत्येक पीडा जणू मोशे किंवा अहरोन यांनी आपली काठी वापरल्यानंतर सुरू झाली. हे लक्षात घेण्यासारखे आहे की ही काठी फारोला चिन्हे दाखविण्यासाठी वापरण्यात आली होती, ज्यायोगे मुक्तीचा संदेश हा एकमेव खऱ्या देवाकडून आहे हे सिद्ध व्हावे.

निर्गम ७:१० मग मोशे व अहरोन ह्यांनी फारोजवळ जाऊन परमेश्वराच्या आज्ञेप्रमाणे केले; अहरोनाने आपली काठी फारो व त्याचे सेवक ह्यांच्यापुढे टाकली तेव्हा तिचा साप झाला.

हे केवळ देवाचे सामर्थ्य दाखविण्यासाठी केलेले मनमानी प्रदर्शन होते काय? या कृतीमध्ये आणखी खोल प्रतीकात्मक अर्थ दडलेला होता काय? जय शुलबर्ग यांनी त्यांच्या संक्षिप्त पुस्तक "आपल्या सौम्य पित्याचे कार्य" ह्यामध्ये काठीच्या वापरामागील आध्यात्मिक अर्थाविषयी एक आकर्षक स्पष्टीकरण दिले आहे:

“मोशेने फारोसामोर देवाचा प्रतिनिधी म्हणून उभे राहायचे होते. या प्रात्यक्षिकामध्ये देवाचा हेतू केवळ सामर्थ्याचे प्रदर्शन करणे नव्हता; तर खरा विनाशकर्ता कोण आहे हे दाखविणारे एक उदाहरण देणे हा होता. जेव्हा मोशेने देवाचा प्रतिनिधी म्हणून आपल्या हातात काठी धरली, तेव्हा ती देवाच्या नियंत्रणाखाली असलेल्या निसर्गशक्तींचे प्रतीक होती. जोपर्यंत देवाचा संरक्षण करणारा हात निसर्गातील विनाशकारी शक्तींना थांबवून धरत होता, तोपर्यंत

---

२०१७ च्या 'ईटिंग ॲनिमल्स' या माहितीपटात दाखवण्यात आला होता. सुदैवाने, त्यांनी आणि इतर अनेकांनी आपल्या कोंबडीपालन केंद्राचे रूपांतर इनडोअर मशरूम वाढवण्याच्या सुविधेमध्ये करून फॅक्टरी फार्मिंग उद्योगातून बाहेर पडण्यात यश मिळवले आहे.

मिसरावर कोणतीही हानी येऊ शकत नव्हती. जेव्हा मोशेने ती काठी खाली टाकली, तेव्हा ती सर्प झाली पाप आणि विनाशाचे प्रतीक. याने हे दर्शविले की निसर्गशक्ती आता देवाच्या नियंत्रणाबाहेर जाऊन सैतानाच्या, म्हणजेच विनाशकर्त्याच्या, नियंत्रणाखाली गेल्या आहेत...

“जर पीडा सुरू झाल्यानंतर कोणत्याही वेळी फारोने आपल्या हट्टी मार्गाचा त्याग करून इस्राएल लोकांना जाऊ दिले असते, तर देवाने पुन्हा निसर्गशक्तींवर नियंत्रण घेतले असते आणि पीडा थांबल्या असत्या. पण त्या हट्टी राजाने तसे केले नाही, आणि मिसर उद्ध्वस्त अवस्थेत सोडले गेले. मिसरावरील पीडांमधील देवाची भूमिका तेव्हा स्पष्ट होते जेव्हा आपण देवाने काठी आणि सर्पाद्वारे दिलेला प्रतीकात्मक संदेश विचारात घेतो.”[16]

जेव्हा अहरोनाने तो सर्प सोडला तेव्हा काय झाले? त्याने इतर सर्पांना गिळून

[16] जे ए. शुलबर्ग, ॲक्ट्स ऑफ अवर जेंटल गॉड (फादर ऑफ लव्ह, २०१७), पृ. २८-२९, https://tinyurl.com/GentleGod.

टाकले पापाच्या आत्मविनाशकारी स्वभावाचे हे किती प्रभावी चित्रण आहे![17]

देव हा मिसराचा खरा संरक्षक होता. तो निसर्गातील विनाशकारी शक्तींना रोखून धरत होता; परंतु विशिष्ट वेळांना, ज्या वेळा मोशे आणि अहरोन आधीच घोषित करीत असत, तो हे संरक्षण काही काळासाठी दूर करीत असे, जेणेकरून हे स्पष्ट व्हावे की या केवळ नैसर्गिक आपत्ती नव्हत्या, तर त्या खरोखर देवाचे न्याय होते. उदाहरणार्थ, एकदा पाणी दूषित झाल्यानंतर, असे दिसते की देव त्यामधील विनाशकारी घटकांना दाबून ठेवत होता आणि पाण्याच्या जीवनदायी गुणधर्मांना टिकवून धरत होता जोपर्यंत नियुक्त वेळ आली नाही. त्या वेळी त्याने पाण्यातील विनाशकारी घटकांना त्यांचे कार्य करण्यासाठी मोकळे सोडले. कदाचित याच कारणामुळे भांड्यांमध्ये साठवलेले पाणीही (निर्गम ७:१९)[18] “रक्त” झाले ते आधीच विषारी घटकांनी दूषित झालेले होते, पण देवाने रासायनिक प्रक्रिया

[17] बॉइड या प्रतिमांची तुलना तांबड्या समुद्राच्या ओलांडण्याच्या ठिकाणी फारोच्या विनाशाच्या संदर्भात करतात. फारोला ड्रॅगनच्या रूपात प्रतीकबद्ध केले गेले होते (यहेज्केल २९:३-५; ३२:२), त्याचप्रमाणे, प्राचीन नजीकच्या पूर्वेकडील संकल्पनेत, तांबड्या समुद्राला देखील देवाचा एक सृष्टीविरोधी, वैश्विक विरोधक म्हणून प्रतीकबद्ध केले गेले होते (cf. chaoskampf), ज्याला अनेकदा ड्रॅगन/सर्प म्हणून चित्रित केले जाते आणि अनेकदा यम (Yam) म्हणून संबोधले जाते (पहा स्तोत्र ७४:१३-१४; ७७:१६, १९-२०; १०६:९; १३६:१३-१४; यशया ५१:९-१०; हबक्कूक ३:१४-१५; इत्यादी). या दृष्टिकोनातून पवित्र शास्त्र दाखवते की, “देवाने हे युद्ध हिंसाचाराने नव्हे, तर एका प्रकारच्या दुष्ट शक्तीला (तांबडा समुद्र, खवळलेले पाणी, राहाब, याम) दुसऱ्या प्रकारच्या दुष्ट शक्तीच्या (फारो/इजिप्त, ‘इजिप्तचे देव’ [निर्गम १२:१२]) विरोधात उभे करून लढले… एकदा का देवाने त्याला रोखून धरणाऱ्या ‘देवाच्या देवदूताला’ आणि ‘मेघाच्या स्तंभाला’ मागे घेतले, की फारोने इस्राएली लोकांचा पाठलाग करणाऱ्या आपल्या सैन्याला आंधळेपणाने थेट त्या वैश्विक अजगराच्या मुखात पाठवले. या क्षणी, यहोवाने यामवरील आपले नियंत्रण काढून घेतले आणि ‘समुद्राला’ ‘आपल्या जागी परत जाण्याची’ परवानगी दिली (निर्गम १४:२७). दुसऱ्या शब्दांत सांगायचे तर, सृष्टीविरोधी अराजकतेच्या राक्षसाला ते करण्याची परवानगी देण्यात आली, जे करण्याची त्याची नेहमीच इच्छा असते—म्हणजेच, जे काही गिळता येईल ते सर्व गिळणे (तुलना करा हबक्कूक ३:१४-५)… तांबड्या समुद्राजवळ एका अजगराने दुसऱ्या अजगराला गिळण्याने ज्या कथेचा कळस झाला, तिची सुरुवात झाली होती "फारोचे दरबारी, जिथे एक ड्रॅगन दुसऱ्या ड्रॅगनला गिळत आहे." बॉइड, क्रुसिफिक्शन ऑफ द वॉरियर गॉड, खंड २, पृ. ११७४, ११७६, ११७७ (सविस्तर चर्चेसाठी, पृष्ठे ११६८-११८५ पहा). तसेच ग्रेगरी बॉइड यांचे 'क्रुसिफिक्शन ऑफ द वॉरियर गॉड' या दोन खंडांच्या ग्रंथाचे अधिक सुलभ आणि संक्षिप्त स्वरूप पाहा, ज्याचे शीर्षक आहे 'क्रॉस व्हिजन: हाऊ द क्रुसिफिक्शन ऑफ जीझस मेक्स सेन्स ऑफ ओल्ड टेस्टामेंट व्हायोलन्स' (मिनियापोलिस, एमएन: फोर्ट्रेस प्रेस, २०१७), अध्याय १४, "ड्रॅगन-स्वॉलोइंग ड्रॅगन वॉरफेअर," https://tinyurl.com/4ayh9nf3. एबेन्स यांनी त्यांच्या 'मिरर प्रिन्सिपल' (फादर ऑफ लव्ह, २०२३) या ग्रंथात, अध्याय २४-२५, https://tinyurl.com/Mirror-Principle मध्ये बॉइड यांच्या विवेचनाला अधिक सखोल अर्थ दिला आहे.

[18] मात्र, मजकुरातील “भांडी” हा शब्द अनुवादकांनी पुरवला आहे.

घडण्यापासून रोखून धरले होते. त्यामुळे जेव्हा त्याने पाण्यापासून आपले जीवनदायी आणि शुद्ध करणारे वचन मागे घेतले, तेव्हा ते रक्तासारखे लाल झाले आणि अत्यंत कडू बनले. जो देव आपल्या आज्ञेने मातीच्या भांड्यांतील पाण्याच्या अणुरचनेत बदल करून त्यास द्राक्षारस बनवू शकतो (योहान २:६–९), तो आपल्या आज्ञेने दूषित पाण्यातील रासायनिक प्रक्रिया रोखू किंवा घडू देऊ शकतो.

परंतु शेवटच्या पीडेचे काय प्रथमजन्मलेल्यांचा मृत्यू? या पीडेचे स्पष्टीकरण देण्यासाठी विविध सिद्धांत मांडले गेले आहेत. उदाहरणार्थ, असे सुचविले जाते की प्रथमजन्मलेले पुरुष मुलांना धान्यासारख्या साधनसंपत्तीमध्ये प्रथम हक्क मिळत असेल आणि ते धान्य आधीच्या पीडांमुळे विषारी किंवा दूषित झाले असेल. ही घटना शारीरिकरित्या कशी घडली याची पर्वा न करता, स्वर्गातील देव या मृत्यूच्या अंतिम स्रोताकडे निर्देश करतात:

निर्गम १२:२३ कारण परमेश्वर मिसऱ्यांचा वध करण्यासाठी देशातून फिरणार आहे; ज्या ज्या घराच्या कपाळपट्टीवर व दोन्ही बाह्यांवर रक्त लावलेले परमेश्वर पाहील ते ते दार तो ओलांडून जाईल आणि नाश करणाऱ्याला तुमचा नाश करण्यासाठी तुमच्या घरात शिरू देणार नाही. (इब्री ११:२८ तुलना करा)

निष्पाप मुलांचा नाश कोणी केला? अजगराने की कोकराने? संहारकाने की देवाने? पवित्र शास्त्रामध्ये स्पष्टपणे “संहारक” म्हणून कोणाची ओळख दिली आहे? ख्रिस्ताने घोषित केले की सैतानाचे, म्हणजे चोराचे, उद्दिष्ट “चोरी करणे, मारणे आणि नाश करणे” हे आहे. योहान १०:१०. तसेच प्रकटीकरणातील पाचव्या रणशिंगामध्ये आपण वाचतो की अथांग डोहाचा दूत असलेल्या सैतानाला “इब्री भाषेत अबद्दोन आणि ग्रीक भाषेत अपोल्योन म्हणजे संहारक” असे म्हणतात. प्रकटीकरण ९:११.

सैतान हा संहारक आहे; ख्रिस्त हा पुनर्स्थापक आहे. मध्यकालीन "ज्युबिलीज"

या पुस्तकामध्येही मिसरातील प्रथमजन्मलेल्यांच्या मृत्यूचे वर्णन असे केले आहे की “जेव्हा मस्तेमा [सैतान] याच्या सर्व शक्तींना मिसर देशातील सर्व प्रथमजन्मलेल्यांना मारण्यासाठी मोकळे सोडण्यात आले, फारोच्या प्रथमजन्मलेल्यापासून गिरणीवर काम करणाऱ्या दासीच्या प्रथमजन्मलेल्यापर्यंत, तसेच पशुधनांपर्यंत.” ज्युबिलीज ४९:२.

परंतु आपण आत्ताच पाहिलेल्या निर्गम १२:२३ मध्ये असे म्हटले नाही का की “परमेश्वर मिसराला मारण्यासाठी जाईल”? होय, परंतु मग इस्राएलाचा नाश कोणी केला? देव म्हणाला होता, “मी त्यांच्यावर दया करणार नाही, त्यांना सोडणार नाही किंवा कृपा दाखवणार नाही, तर त्यांचा नाश करीन.” यिर्मया १३:१४. जरी देवाचे वर्णन त्यांना प्रत्यक्ष मारणारे म्हणून केले गेले असले, तरी प्रत्यक्षात त्यांनी त्यांना “बाबेलचा राजा नबुखद्नेस्सर आणि... त्यांच्या शत्रूंच्या” स्वाधीन केले, “आणि तो त्यांना सोडणार नाही, दया करणार नाही किंवा कृपा करणार नाही.” यिर्मया २१:७. हे बायबलमधील अनेक उदाहरणांपैकी एक आहे, जिथे “देव आणि देवाचे प्रतिनिधी... एकाच विनाशकारी क्रियापदांचे कर्ते म्हणून वर्णिले जातात.”[19] म्हणून देवाने मिसरातील प्रथमजन्मलेल्यांना त्याच प्रकारे “मारले” जसे त्यांनी आपल्या खऱ्या प्रथमजन्मलेल्या येशूला “मारू दिले” (मार्क १४:२७) म्हणजेच संहारकाला त्यांना मारण्याची परवानगी देऊन. दोन्ही प्रसंगांमध्ये देवाने निष्पापांना दुष्टांच्या हातून दुःख सहन करू दिले, जेणेकरून संहारकाचे खरे स्वरूप प्रकट व्हावे आणि जग देवाशी पुन्हा मेलमिळापात यावे.

ख्रिस्त, देवाचे कोकरू, आपल्या रक्ताने मिसरी आणि इब्री या दोघांचेही संरक्षण करू इच्छित होता; परंतु त्यांनी त्याला तसे करू दिले नाही. ही गोष्ट ग्रीक जुन्या करारामध्ये (LXX) अधिक स्पष्टपणे दिसून येते, जिथे असे म्हटले आहे की, “हे रक्त तुम्ही ज्या घरांत आहात त्यांवर तुमच्यासाठी चिन्ह ठरेल; आणि मी ते रक्त पाहीन व तुमचे संरक्षण करीन, आणि विनाशाची पीडा तुमच्यावर येणार

[19] टेरेन्स ई. फ्रेथाइम, क्रिएशन अनटेम्ड: द बायबल, गॉड, अँड नॅचरल डिझास्टर्स (ग्रँड रॅपिड्स: बेकर अकॅडेमिक, २०१०), पृ. ५३.

नाही..."[20] कोकराचे रक्त म्हणजे ख्रिस्ताचे जीवन होय (उत्पत्ति ९:४; लेवीय १७:११ इ.), आणि ख्रिस्ताचे जीवन धार्मिक आहे. म्हणून रक्ताने "झाकले जाणे" हे विश्वासाद्वारे ख्रिस्ताची धार्मिकता प्राप्त करण्याचे प्रतीक आहे! परंतु आपण ख्रिस्ताची धार्मिकता तेव्हाच प्राप्त करू शकतो जेव्हा आपण: (१) ख्रिस्ताविरुद्ध असलेला आपला लपलेला वैरभाव कबूल करतो, आणि (२) ख्रिस्ताचे निःस्वार्थ प्रेम पाहतो

आणि या दोन्ही गोष्टी कोकराच्या वधामध्ये आणि वधस्तंभावर प्रकट होतात. याच कारणामुळे वल्हांडणाचा सण, ज्यामध्ये कोकराचा वध केला जात असे, आणि बेखमीर भाकरीचा सण, ज्यामध्ये खमीर म्हणजे पापाचे प्रतीक घरातून (अंतःकरणातून) काढून टाकले जात असे, हे विशेष चिन्ह म्हणून वर्णिले गेले आहे (देवाच्या शिक्क्यासारखे):

निर्गम १३:९ हे तुझ्या हातावर चिन्ह व तुझ्या डोळ्यांच्या दरम्यान स्मारक असे असावे; परमेश्वराचा नियम तुझ्या तोंडी असावा; कारण परमेश्वराने भुजबलाने तुला मिसर देशातून बाहेर आणले;

जेव्हा १,४४,००० लोक विश्वासाद्वारे ख्रिस्ताच्या धार्मिक जीवनाने, म्हणजे त्याच्या रक्ताने, आच्छादित होतील आणि त्यांनी देवाचा शिक्का प्राप्त केलेला असेल, तेव्हा देव संहारकाला त्यांना त्रास देऊ देणार नाही; कारण त्यांनी परात्पराच्या गुप्त स्थानी आश्रय घेतलेला असेल (स्तोत्र ९१:१).

स्तोत्र ९१:३–११ कारण तो पारध्याच्या पाशापासून घातक मरीपासून तुझा बचाव करील. 4तो तुझ्यावर पाखर घालील, त्याच्या पंखांखाली तुला आश्रय मिळेल; त्याचे सत्य तुला ढाल व कवच आहे. 5रात्रीच्या समयीचे भय, दिवसा सुटणारा बाण, 6काळोखात फिरणारी मरी, भर दुपारी नाश करणारी पटकी, ह्यांची तुला भीती वाटणार नाही. 7तुझ्या बाजूस सहस्रावधी पडले, तुझ्या उजव्या हातास

[20] टेरेन्स ई. फ्रेथाइम, क्रिएशन अनटेम्ड: द बायबल, गॉड, अँड नॅचरल डिझास्टर्स (ग्रँड रॅपिड्स: बेकर अकॅडेमिक, 2010), पृ. 53.

लक्षावधी पडले, तरी ती तुला भिडणार नाही; 8मात्र तुझ्या डोळ्यांना ती दिसेल, आणि दुर्जनांना प्राप्त होणारे प्रतिफल तुझ्या दृष्टीस पडेल. 9कारण परमेश्वर माझा आश्रय आहे असे म्हणून तू परात्पराला निवासस्थान केले आहेस, 10म्हणून कोणतेही अरिष्ट तुझ्यावर येणार नाही, कोणतीही व्याधी तुझ्या तंबूजवळ येणार नाही. 11कारण तुझ्या सर्व मार्गांत तुझे रक्षण करण्याची तुझ्याविषयी तो आपल्या दिव्यदूतांना आज्ञा देईल.

शेवटी, जे सर्व देवाव्यतिरिक्त इतर कोणाची सेवा निवडतात, त्यांचा नाश त्याच शक्तीद्वारे होईल. जसे इस्राएलने ख्रिस्ताऐवजी निवडलेल्या आपल्या आध्यात्मिक शत्रू रोमनांद्वारे शेवटी नाश अनुभवला; आणि जसे मिसरी लोकांनी ख्रिस्ताऐवजी निवडलेल्या आपल्या आध्यात्मिक शत्रू सैतानाद्वारे नाश अनुभवला; तसेच शेवटी संपूर्ण जगही ख्रिस्ताऐवजी ज्याचे पालन करण्याची निवड करेल त्या आपल्या आध्यात्मिक शत्रूद्वारे नष्ट होईल. अशा प्रकारे, ख्रिस्त शेवटी लोकांनी निवडलेल्या नेत्याच्या स्वाधीन त्यांना करण्यास बाध्य होतात, आणि तेव्हा हे उघड होईल की ज्याची त्यांनी आरोग्यदाता आणि संरक्षक म्हणून उपासना केली, तो प्रत्यक्षात तसा मुळीच नव्हता. पीडांची भौतिक “कारणे” काहीही असली, तरी त्यामागील आध्यात्मिक कारण आणि धडा कायम तोच राहतो: जेव्हा आपण देवाला आणि त्याच्या मार्गांना नाकारतो, तेव्हा तो आपल्याला आपण जे पेरले आहे ते उगवण्यासाठी “सोडून देण्यास” बाध्य होतो.

काही लोकांना या पीडांमध्ये नैसर्गिक स्पष्टीकरणांचा सहभाग हा देवाच्या अलौकिक कार्यावर आक्रमण वाटतो; परंतु तसे असण्याची गरज नाही, कारण इस्राएलचा देव हा सृष्टीकर्ता आहे. देवाने मिसरी लोकांना त्यांनी पृथ्वीमध्ये जे पेरले त्याचे नैसर्गिक परिणाम उगवू देऊन त्यांचा नाश होऊ दिला असावा, ही कल्पना आज आपल्यासाठी असलेला संदेश कमी करत नाही सुरक्षिततेचे आणि जीवनाचे एकमेव स्थान म्हणजे ख्रिस्त, जीवनाचे झाड. आज आपण संपूर्ण निसर्गाच्या कोलमडून पडण्याचे परिणाम भोगत नाही, याचे एकमेव कारण म्हणजे देवाचा जीवनदायी आणि सर्वकाही टिकवून धरणारा आत्मा अजूनही

पृथ्वीवर आहे. परंतु जर मिसरामध्ये स्थानिक पातळीवर देवाच्या आत्म्याला नाकारल्यामुळे त्यांच्या राष्ट्रावर पीडा आल्या आणि त्याचा नाश झाला, तर जर संपूर्ण जगाने देवाच्या आत्म्याला नाकारले तर काय होईल?

